## —: जाहिर निविदा :—

याद्वारे आपणास कळविणेत येते की, मा. दिवाणी न्यायालय, व. स्तर, अहमदनगर या न्यायालयाचे आवारात फक्त न्यायालयीन कागदपत्राच्या छायाकित प्रती काढणेसाठी विहित कार्य पध्दतीचा अवलब करून व करार नाम्यातील अटी व शर्तीच्या अधिन राहुन नवीन झेरॉक्स सर्व्हीस प्रोव्हायडरचे कामासाठी अपंग व्यक्तीची किवा इच्छुक व्यक्तींची झेरॉक्स सर्व्हीस प्रोव्हायडर म्हणुन नेमणुक करावयाची असुन त्यासाठी त्यांच्याकडे स्वतःची झेरॉक्स मशीन असणे आवश्यक आहे व त्याना झेरॉक्स कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे

तरी वरील कामासाठी इच्छुक व्यक्तीनी किवा मा. उच्च न्यायालय, मुबई याचे निर्देशान्वये अपंग व्यक्तीनां झेरॉक्स सर्व्हीस प्रोव्हायडर म्हणून प्राधान्य देण्याचे असल्याने अपंग व्यक्तीनी आपले अर्ज दिनाक १४/०७/२०२४ अखेर सायकाळी ०६:०० पर्यत दिवाणी न्यायालय, व स्तर, अहमदनगर येथील आवक—जावक विभागात सादर करावेत तसेच अपग व्यक्तीना प्राधान्य दिले जाणार असल्यामुळे अर्जासोबत अपग प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडण्यात यावी.

तसेच मा. महोदयाच्या तोडी आदेशान्वये झेरॉक्स सर्व्हिस प्रोव्हायडर म्हणून नियुक्त करण्यात येणा—या व्यक्ती / फर्मकरीता झेरॉक्स ऑउटसोर्सिगच्या कामासाठी ए—४ कागदाकरीता रुपये १—२५ पैसे, लिगल कागदाकरीता रुपये १—५० पैसे व ए—३ कागदाकरीता रुपये २—०० अशी रक्कम आकारण्यासाठी मजूरी देणेबाबत विचाराधिन आहे दिनाक १४/०७/२०२४ रोजी सायकाळी ०६.०० नंतर येणा—या अर्जाचा विचार केला जाणार नाही

आज दिनाक १४/०६/२०२४ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्यानिशी जाहिर नोटीस प्रसिध्द केली असे.

हुकूमावरुन,
सहा अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, व स्तर,
अहमदनगर

दिवाणी न्यायालय, व. स्तर, अहमदनगर
दिनाक :— १४/०६/२०२४

**प्रत :—**

१. मा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर याचे नोटीस बोर्ड.
२. मा. दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अहमदनगर, याचे नोटीस बोर्ड
३ मा. मुख्यन्यायदडाधिकारी, अहमदनगर याचे नोटीस बोर्ड
४ मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहमदनगर याचे नोटीस बोर्ड
५. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर
६. मा. कोषागार अधिकारी, अहमदनगर
७. मा. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
८. जिल्हा न्यायालय, अहमदनगर ई—कोर्ट साईट
९. झेरॉक्स दुकाने असलेले ठिकाण
१०. स्थानिक पातळीवरील शैक्षणिक संस्था/सेवाभावी सस्था/बॅका